पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक ४८ )
शुक्रवार, दिनांक १९/८/२०२२, दुपारी ४.०० वाजता

पुणे महानगरपालिकेची मासिक (सर्वसाधारण) सभा (माहे ऑगस्ट २०२२ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १९/८/२०२२ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालय येथे भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार, भा.प्र.से. | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा. डॉ.आशिष भारती | - | आरोग्य प्रमुख |
| ३) | मा. श्रीनिवास कंदूल | - | मुख्य अभियंता (विद्युत) |
| ४) | मा.शिवाजी दौंडकर | - | नगरसचिव |

मा. विक्रम कुमार, भा.प्र.से., प्रशासक तथा महापालिका आयुक्त हे अध्यक्षस्थानी होते.

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

वृत्तांत कायम करणे.

सभा क्र. १, दिनांक ११/४/२०२२ ते सभा क्र. ४७, दिनांक २५/७/२०२२ असे एकूण ४७ वृत्तांत कायम करण्यासाठी सादर करण्यात आले.

**मा.प्रशासक :** सदरचे वृत्तांत कायम करण्यात यावेत.

**एकूण ४७ सभा वृत्तांत कायम करण्यात आल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.**

**मा.प्रशासक :** कार्यपत्रिका सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे ऑगस्ट २०२२ कार्यपत्रिका. कार्यपत्रिकेवर प्रथम दाखल करुन घेणेसाठी खालीलप्रमाणे विषय आलेले आहेत.

विषय क्रमांक :- १/११८

संदर्भ- १)मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/१०,दि.१५/०४/२०१५
२)मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.९८४,दि.२९/०१/२०१८
३)मा.स्थायी समिती ठराव क्र.११३,दि.२८/०४/२०२०
४)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल.व्यव/३४३,दि.२१/०७/२०२२ चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६६, दि. १९/८/२०२२
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५१,दि.१९/८/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पी.एम.पी.एम.एलला भाड्याने दिलेल्या एकूण २३ मोकळ्या जागा व ०३ बांधीव जागा जुलै २०२२ अखेर सदर भाडे रक्कम पी.एम.पी.एम.एलला अदा करावयाच्या संचलनतूटीच्या RE58A101A रकमेतून वळतीकरून मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील RI22A101(भूमी) या अर्थशिर्षकावर र.रू.९,३०,३५,३६३/- व RI22A103 (भवन) या अर्थशिर्षकावर र.रू.१,६४,४९६/- अशी एकूण र.रू.९,३१,९९,८५९/- संचलनतूटीतून जमा करून घेण्याकरिता खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पी.एम.पी.एम.एलला भाड्याने दिलेल्या एकूण २३ मोकळ्या जागा व ०३ बांधीवजागाजुलै २०२२ अखेर सदर भाडे रक्कम पी.एम.पी.एम.एलला

२) अदा करावयाच्या संचलनतूटीच्या RE58A101A रकमेतून वळती करून मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील RI22A101(भूमी) या अर्थशिर्षकावर र.रू.९,३०,३५,३६३/- व RI22A103 (भवन) या अर्थशिर्षकावर र.रू.१,६४,४९६/- अशी एकूण र.रू.९,३१,९९,८५९/ संचलनतूटीतून जमा करून घेणेस.

३) सदर भाडे रक्कम वळती करून घेणेस.

विषय क्रमांक :- २/११९

संदर्भ- १) टेंडर क्र.प्रकल्प-२१-२०२१-२२
२) पार्किंग पॉलिसी बाबत मा.मुख्य सभा ठराव क्र.१०९२,दि.२३.०३.२०१८.
३) मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/३६३,दि.२५.०७.२०२२ चे पत्र.
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६७, दि. १९/८/२०२२
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५२,दि.१९/८/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन-

पुणे शिवाजीनगर (भांबुर्डा) फा.न.५७६/१ सि.स.नं.१९१६/१ येथील वाहनतळ ३ वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश दिनांकापासून मक्ता पद्धतीने चालविणेकरीता व्यवस्थापन व संचलन करणेबाबत निविदा मागविल्या असता निविदेतील सर्वाधित दर देणारे निविदाधारक मे.के.के.डी.के.कन्स्ट्रक्शन, स.नं.६७० ७१, बिबवेवाडी, चाळ नं.बी.३२,पुणे-४११०३७ यांनी देऊ केलेली वार्षिक मक्ता रक्कम रूपये२८,२८,७४९.९३(अक्षरी र.रू.अठ्ठावीस लक्ष अठ्ठावीस हजार सातशे एकोणपन्नास पैसे त्र्याण्णव फक्त) ही म.न.पा.निर्धारित रक्कम रूपये१८,२४,९९९.९६(अक्षरी रक्कम रूपये अठरा लक्ष चोवीसहजार नऊशे नव्यान्नव पैसे शह्यान्नव फक्त) पेक्षा रक्क्म रूपये १०,०३,७४९.९८ (अक्षरी रक्कम रूपये दहा लक्ष तीनहजार सातशे एकोनपन्नास पैसे अठ्ठान्नव फक्त) ने जास्त आहे. तरी सदर वाहनतळ निविदा टेंडर अटीशर्तीप्रमाणे कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी मक्ता पद्धतीने चालविणेस व प्रतिवर्षी मक्ता रकमेवर २% आयकर घेणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्रमांक :- ३/१२०

संदर्भ- १) मालमत्ता व व्यवस्थापन विभाग आ.क्र.३९४९,दि.२२/०७/२०२२ चे पत्र.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/३७७,दि.२८/०७/२०२२ चे पत्र.
३) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६९, दि. १९/८/२०२२
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५३,दि.१९/८/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन-

सारथी संस्थेच्या कामकाजाकरीता पुणे महानगरपालिकेकडील हॉल विभागीय कार्यालयासाठी उपलब्ध करून देणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) पुणे पेठ शिवाजीनगर सावरकर भवन येथील पहिल्या मजल्यावरील १८८.३४ चौ.मी.क्षेत्रफळाचा हॉल सारथी या संस्थेस दरमहा र.रू. ३६,४६५/- इतक्या रकमेची भाडे आकारणी करून ३ वर्ष कालावधीकरीता मिळकतवाटप नियमावली २००८ मधील अटी शर्तीस अधीनराहून भाडेपट्ट्याने देणेस.

विषय क्रमांक :- ४/१२१

संदर्भ- १) केबीपी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांचा स्ट्रक्चरल ॲडीट रिपोर्ट.
२) नेताजी सुभाषचंद्र बोस शाळा प्रमुख यांचे आ.क्र.४८१,दि.२८/०४/२०२१ चे पत्र.
३) या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.२६१,दि.०३/०५/२०२१ चे पत्र.
४) भवनरचना कार्यालयाकडील पत्र जा.क्र.१५८९,दि.०६/०७/२०२२ चे पत्र.
५) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग यांचे जा.क्र.इओ/७५४,दि.०८/०७/२०२२ चे पत्र.
६) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७०, दि. १९/८/२०२२
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५४,दि.१९/८/२०२२

-----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

येरवडा येथील नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय इमारत धोकादायक बनलेली असल्यामुळे, सदर विद्यालयाच्या आवारा मधील दक्षिण भागा मधील धोकादायक शाळा इमारतीचे तळ + पहिल्या मजल्याचे अंदाजे ३९० चौ.मी. तसेच शाळेच्या मुख्य प्रवेशाद्वारा समोरील मोडकळीस आलेले तळ मजल्याचे अंदाजे ४५ चौ.मी. धोकादायक इमारतीचे संपूर्ण बांधकाम मालमत्ता निर्लेखित (Write off) करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्रमांक :– ५/१२२

**संदर्भ–** १) पुणेपेठ स.नं.११३,फा.प्लॉट नं.५४०/५, टी.पी.एस. III सिंहगड रोड येथील जागेवर बांधलेले वीर बाजी पासलकर स्मारकाची ताबे पावती जा.क्र.माव्य/५०३१,दि.०८/११/२०२१.
२) मा.मुख्य सभा ठराव क्र.६५५,दि.२२/११/२०२१.
३) सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील दि.२६/०३/२०२२ चे जाहीर प्रकटन.
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३९२,दि.०१.०८.२०२२ चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ७२, दि. १९/८/२०२२
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५५,दि.१९/८/२०२२

––––

मिळकतवाटप नियमावली २००८ मधील भाग ६ मुद्दा क्र.६(५) व भाग १० मुद्दा क्र.२३ (१ ते ४) अन्वयेच्या तरतुदीनुसार स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान व पुणे मनपा यांचे संयुक्त प्रकल्प अंतर्गत ना नफा नातोटा (NOT FOR PROFIT) या तत्वावर पुणे पेठ पर्वती स.नं.११३,फा.प्लॉट नं.५४०/५, टी.पी.एस.III, सिंहगडरोड येथील जागेवर बांधलेले वीर बाजी पासलकर स्मारक सदर संस्थेस ३० वर्ष कालावधीपर्यंत चालविणेस देणेस, सदर संस्थेकडून अनामत रक्कम म्हणून र.रू. ३,००,०००/– इतकी भरणा करून घेणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्रमांक :– ६/१२३

**संदर्भ–** १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/४३६, दि. १९/८/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५५६,दि.१९/८/२०२२

––––

सर्व्हे नंबर ११४/११५ बाणेर येथे वर्किंग वूमन हॉस्टेल बांधणेसाठी र.रू. १७५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग, पुणे महानगरपालिका,<br>बजेटकोड नं. उए२२अ६५५+,स.नं. १३७/१, पाषाण येथे महिला भवन बांधणे. | १७५ लक्ष | ––– |
| नवीन सुचविलेले काम –<br>भवन विभाग,पुणे महानगरपालिका, सर्व्हे नंबर ११४/११५ बाणेर येथे वर्किंग वूमन हॉस्टेल बांधणे<br>बजेटकोड नं. FE14C125/SM1-35 | ––– | १७५ लक्ष |

**एकूण ६ (सहा) विषय दाखल करुन घेण्यात आले.**

**मा.प्रशासक :** विषय घ्या.

**नगरसचिव :** मा.सभापती यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्रमांक : ९७**

कोरोना प्रतिबंधक उपाय योजनेअंतर्गत महापालिकेच्या खेडेकर हॉस्पिटल मध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लॅन्ट बसविणेसाठी आवश्यक असणारे स्थापत्यविषयक कामे करणेबाबत,मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन /३१३, दि. १९/७/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४२

संदर्भ– १) मा. महापौर श्री.मुरलीधर मोहोळ यांचेनगरसचिव कार्यालयाकडील जा.क्र.२७२,दि. २२/४/२०२१ रोजीचे ऑक्सिजन जनरेटिंग ''महापौर निधीतून'' रक्कम उपलब्ध करून देणेबाबतचे पत्र.
२) मा. मुख्य अभियंता (विद्युत) कार्यालय यांचेकडील जा.क्र. २४९, दि. ६/५/२०२१ चे निवेदन
३) मा.शहरअभियंता कार्यालय यांचेकडील जा.क्र. श.अ.ज/जा/२८०२,दि. ३१/५/२०२१ चे निवेदन.

४) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन /३१३, दि. १९/७/२०२२ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१६, दि.२२/७/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

कोरोना प्रतिबंधक उपाय योजनेअंतर्गत महापालिकेच्या खेडेकर हॉस्पिटल मध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लॅन्ट बसविणेसाठी आवश्यक असणारे स्थापत्यविषयक कामे मे. सचिन फेब्रीकेशन, पुणे यांचेकडून पूर्वगणित टेंडर रकमेच्या ( जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस वगळून येणारी रक्कम) ॲटपारदराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये करून घेणेची व ठेकेदारास त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार ॲटपारदराने व अधिक जी एस टी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेस नुसार येणाऱ्यार.रू. १८,९१,७९६.५६ (र.रू. अठरा लक्ष एक्क्याण्णव हजार सातशे शहाण्णव रूपये छपन्न पैसे )रकमेपर्यंत बिल आदा करणेची बाब अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : ९८

पुणे महानगरपालिकेचे स्व. राजीव गांधी रूग्णालय येरवडा व कै. अण्णासाहेब मगर हॉस्पिटल येथे पिडियाट्रिक व ॲडल्ट असे दोन्ही वॉर्डस, ऑक्सिजन बेडस व आयसीयु कार्यान्वित करण्यात आले होते. आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये अत्यावश्यक सेवेच्या अंतर्गत सदरच्या हॉस्पिटलमध्ये व्हेंटिलेटर्स, ट्रान्स्पोर्ट व्हेंटिलेटर्स, एचएलओ मशिन्स, ईसीजी मशिन्स, डिफॅब्रीलेटर्स, सक्शन मशिन्स, सिरींज पंप, मॉनिटर्स अशी वैद्यकीय उपकरणे व सामुग्रीची देखभाल दुरुस्ती इनामदार मेडिकल इक्विपमेंट सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस यांचेकडून दिनांक २/१/२०२२ ते दिनांक ३१/३/२०२२ या कालावधी मध्ये करून घेण्यात आली होती. सदरच्या कामाकरिता प्रतिमहा रक्कम रूपये २,३६,०००/– प्रमाणे ३ महिन्यांकरिता रक्कम रूपये ७,०८,०००/– पर्यंत देखभाल दुरूस्तीकामी खर्च झालेला आहे. सदरचा खर्च सन २०२२–२३ मधील RE17F139 रूग्णालयाकडील मशिनरी व इतर देखभाल दुरूस्ती या अंदापत्रकीय अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यातआलेला असून सदर बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) नुसार अवलोकनार्थ सादर करण्याबाबत, महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/३१४दि. १९/७/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४३

संदर्भ– १) महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३१४, दि. १९/७/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४१७, दि.२२/७/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिकेचे स्व. राजीव गांधी रूग्णालय येरवडा व कै. अण्णासाहेब मगर हॉस्पिटल येथे पिडियाट्रिक व ॲडल्ट असे दोन्ही वॉर्डस, ऑक्सिजन बेडस व आयसीयु कार्यान्वित करण्यात आले होते. आणिबाणीच्या परिस्थितीमध्ये अत्यावश्यक सेवेच्या अंतर्गत सदरच्या हॉस्पीटलमध्ये व्हेंटिलेटर्स, ट्रान्सपोर्ट व्हेंटिलेटर्स, एच.एफ.ओ.मशिन्स, ई.सी.जी.मशिन्स, डिफॅब्रीलेटर्स, सक्शन मशिन्स, सिरींज पंप, मॉनिटर्स अशी वैदयकीय उपकरणे व सामुग्रीची देखभाल दुरूस्ती इनामदार मेडिकल इक्विपमेंट सेल्स ॲन्ड सर्व्हिसेस यांचेकडून दिनांक २/१/२०२२ ते दिनांक ३१/३/२०२२ या कालावधी मध्ये करून घेण्यात आली होती. सदरच्या कामाकरिता प्रतिमहा रक्कम रूपये २,३६,०००/– प्रमाणे ३ महिन्यांकरिता रक्कम रूपये ७,०८,०००/– पर्यंत देखभाल दुरूस्तीकामी खर्च झालेला आहे. सदरचा खर्च सन २०२२–२३ मधील **RE17F139** रूग्णालयाकडील मशिनरी व इतर देखभाल दुरूस्ती या अंदापत्रकीय अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यातआलेला असून सदर बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. ९८ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक :९९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा हा उपक्रम पुणे महानगरपालिका स्तरावर राबविणेसाठी वर्गीकरणाने र.रू. १ कोटी २५ लाख उपलब्ध करून देणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था–४/३२२, दि. २१/७/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४४

संदर्भ– १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण ८२२२/प्र.क्र.११०(भाग-२)/सां.का.४ दि.२०/०६/२०२२.
२) नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२११/नवि-२०,दि.०७/०७/२०२२

३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था–४/३२२,दि. २१/७/२०२२ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.४२१, दि.२२/७/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत “हर घर तिरंगा” हा उपक्रम पुणे महानगरपालिका स्तरावर राबविणेसाठी वर्गीकरणाने रक्कम रू.१ कोटी २५ लाख उपलब्ध करून देणे साठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर कामी ध्वज खरेदी करणेसाठी खालील नमूद अर्थशीर्षकावरून रु.१.२५(एक कोटी पंचवीस लाख फक्त ) लाखचे वर्गीकरण करून वर्गीकरणाने उपलब्ध होणारी रक्कम खर्च करणेसाठी खर्चाचे नविन अर्थशीर्ष निर्माण करणेस, त्यावर सदरची रक्कम वर्ग करणेस,
२) वर्गीकरणाने उपलब्ध होणाऱ्या रक्कमेतून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत “हर घर तिरंगा” हा उपक्रम पुणे महानगरपालिका स्तरावर राबविणेसाठी ध्वज व तदनुषंगिक बाबींची खरेदी, उपक्रमाची प्रसिद्धी, प्रचार-प्रसार यासाठी आवश्यक ते साहित्य खरेदी, तसेच उपक्रम राबविणेसाठी आवश्यक असणाऱ्या विविध कामांसाठी रक्कम खर्च करणेस,
३) खरेदी केलेले ध्वज विक्री / वितरण केंद्रांचे माध्यमातून नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्यानंतर त्याठिकाणी होणाऱ्या ध्वज विक्रीमधून जमा होणारा निधी मनपानिधी मध्ये जमा करणेसाठी जमेचे अर्थशीर्ष निर्माण करणेस,
४) सदर उपक्रमाकरिता आवश्यक त्या साहित्याची खरेदी प्रक्रिया भांडार विभागामार्फत राबविणेस,

| अंदाजपत्रकातील बाब | वर्ग करावयाची रक्कम | अधिक खर्च रू |
|---|---|---|
| सन २०२२–२३ चे अंदाजपत्रक,आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका,बजेटकोड **CE17A242/SJ6-93** भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | १ कोटी २५ लाख | --- |
| नवीन सुचविलेले काम – | | |
| भांडार विभाग<br>स्वातंत्र्य अमृत महोत्सव अंतर्गत ‘‘ हर घर तिरंगा’’ उपक्रम राबविणेकरिता पुणे महानगरपालिकास्तरावर तिरंगा ध्वज खरेदी करणे व या उपक्रमासाठी इतर अनुषंगिक खर्च | --- | १ कोटी २५ लाख |

निर्णय : विषय क्र. ९९ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १००

पुणे मनपाचे कै. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटल, बालाजीनगर, आऊट सोर्सिंगद्वारे चॅरिटेबल ट्रस्ट/ खाजगी वैद्यकीय संस्था/स्वयंसेवी संस्था यांना शासकीय दरात चालविणेस देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/३४५, दि. २२/७/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४५

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३४५, दि. २२/७/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४०, दि.२२/७/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाचे कै. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटल, बालाजीनगर, आऊट सोर्सिंगद्वारे चॅरिटेबल ट्रस्ट/ खाजगी वैद्यकीय संस्था/स्वयंसेवी संस्था यांना शासकीय दरात चालविणेस देणे ( टेंडर क्रमांक ३ सन २०२२–२३ ) कामी महाटेंडर या ऑनलाईन पोर्टलवर निविदा मागविल्या असता आलेल्या २ टेंडर्सपैकी हेल्थकेअर मेडिकल फाऊंडेशन यांचे टेंडर (सी.जी.एच.एस. दराच्या मूळ रकमेवर २१% कमी दराने ) असल्याने त्यांचेसोबत करारनामा करणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.

१. हेल्थकेअर मेडिकल फाऊंडेशन, १६ युनिव्हर्सल अपार्टमेंट, ईस्ट स्ट्रीट कॅम्प, पुणे ४११००१ यांनाकै. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटल, बालाजीनगर या जागेमध्ये पुणे मनपा संयुक्त विद्यमाने पी.पी.पी. तत्वावर आय.सी.यु, जनरल वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, रेडिआलॉजी विभाग, लॅब व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल/जनरल हॉस्पिटलकडील सर्व अनुषंगिक सुविधा या सर्व सेवा सुविधांकरिता ७ वर्षाच्या मुदतीच्या कराराने चालविणेस व त्यांची सेवा समाधानकारक असल्यास दर ७ वर्षाच्या टप्प्याने असे एकूण २८ वर्षे मुदतीकरिता चालविणेस देणेस.

२. हेल्थकेअर मेडिकल फाऊंडेशन१६ युनिव्हर्सल अपार्टमेंट, ईस्ट स्ट्रीट कॅम्प, पुणे ४११००१ यांचेकडून कै. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटल, बालाजीनगर या जागेमध्ये निविदेमध्ये सादर केलेल्या सी.जी.एच.एस. दराच्या मूळ रकमेवर २१% कमी दराने आय.सी.यू., जनरलवॉर्ड,ऑपरेशन थिएटर, रेडिआलॉजी विभाग, लॅब व मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल/जनरल हॉस्पिटलकडील सर्व अनुषंगिक सुविधा या सर्व सेवासुविधा उपलब्ध करून घेणेस.

३. हेल्थकेअर मेडिकल फाऊंडेशन१६ युनिव्हर्सल अपार्टमेंट, ईस्टस्ट्रीट कॅम्प, पुणे ४११००१ यांचेकडून सदरचा प्रकल्प पुणे मनपा संयुक्त विद्यमाने ७ वर्षाच्या मुदतीच्या कराराने चालविणेस व त्यांची सेवा समाधानकारक असल्यास दर ७ वर्षाच्या टप्प्याने असे एकूण २८ वर्षे मुदतीकरिता चालविणेस देणेकामी आवश्यक तो करारनामा करणेस व संयुक्त प्रकल्पात कोणताही प्रश्न उद्भभल्यास किंवा अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

निर्णय : विषय क्र. १०० संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०१

पुणे पेठ शिवाजीनगर बालगंधर्व रंगमंदिर शेजारी पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा कै.ना.ग.नांदे जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/२५६,दि.११.७.२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४६

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/२५६,दि.११.७.२०२२ चे पत्र .
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.५१,दि.२२/०७/२०२२.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७६, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ शिवाजीनगर बालगंधर्व रंगमंदिर शेजारी पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा कै.ना.ग.नांदे जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता निविदेतील क्र.१ चे निविदादार चॅम्पीयन अॅक्वाटीक क्लब, पत्ता–१५१५, सदाशिव पेठ, पुणे–३० यांनी देऊ केलेली मासिक भाडे रक्कम रूपये १,४५,०००/–(अक्षरी र.रू.एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) ही मनपाने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा रूपये ७,३८७/–(अक्षरी रक्कम रू. सातहजार तीनशे सत्याऐंशी फक्त) ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार, निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. १०१ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०२

पुणे पेठ पर्वती,स.नं .७५/७६ समतानगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल येथील जलतरण तलाव, व्यायामशाळा व योगहॉल (क्षेत्रफळ ५८०.४५ चौ.मी.) लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/२६०, दि. ११.७.२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४७

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/२६०,दि. ११.७.२०२२ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ५३, दि. २२/७/२०२२ चा विचारासाठी.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४७८, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ पर्वती,स.नं.७५/७६ समतानगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल येथील जलतरण तलाव, व्यायामशाळा व योगहॉल (क्षेत्रफळ ५८०.४५ चौ.मी.) लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता निविदेतील क्र.१ चे निविदादार आर.बी.इंटरप्रायसेस, पत्ता–एस.आर.नं.१२१/ए, प्लॉट नं.२३, यशवंत कॉलनी, जामनेर रोड, भुसावळ (शहर) भुसावळ, जळगाव ४२५२०१ यांनी देऊ केलेले मासिक भाडे रक्कम रूपये १,३६,०००/–(अक्षरी र.रू.एक लाख छत्तीस हजार फक्त) ही म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा रूपये ४७५/–ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार, निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. १०२ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०३

पुणे पेठ शुक्रवार पेठ सि.स.नं.११५८,११५९,११६० या ठिकाणी बांधण्यात आलेले कै.प्रमोद महाजन क्रीडा संकुल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/३१९,दि.१९.७.२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४८

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/क्रिडा/३१९,दि.१९.७.२०२२ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ६२, दि. २२/०७/२०२२
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.४८०, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ शुक्रवार पेठ सि.स.नं.११५८,११५९,११६० या ठिकाणी बांधण्यात आलेले कै.प्रमोद महाजन क्रीडा संकुल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता निविदेतील अ.क्र.१ चे निविदादार एच २ ओ ॲक्वा फन अनलिमिटेडपुल्स, पत्ता–५५७/१, शुक्रवार पेठ, सुभाषनगर, लेन नं.१,पुणे–०२ यांनी देऊ केलेली मासिक भाडे रक्कम रूपये १,५३,०००/–(अक्षरी र.रू.एक लाख त्रेपन्नहजार फक्त) म.न.पा. ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा रक्कम रूपये ५२,२००/–ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार, निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय : विषय क्र. १०३ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०४

पुणे शहरातील मनपा मिळकतीच्या नाल्याच्या कडेने सिमाभिंती बांधणे या कामांसाठी र.रू. ४५२ लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र.मआ/मलनिः/३८५, दि. १/८/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १४९

संदर्भ– १) वित्तीय समितीचे बैठकीचे इतिवृत्त जा.क्र. ६७७, दि. २४/५/२०२२
२) मा. महापालिका आयुक्त प्रशासकीय मान्यता ठ.क्र. ६/२१९,दि. २२/६/२०२२
३) मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/मलनिः/३८५,दि. १/८/२०२२ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१३, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरातील मनपा मिळकतीच्या नाल्याच्या कडेने सिमाभिंती बांधणे या कामांसाठी र.रू. ४५२ लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, मलनिःस्सारण देखभाल दुरूस्ती विभाग, पुणे महानगरपालिका, बजेटकोड नं. **FE61A118/B116**, नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये विविध स्वरूपाची कामे करणे | ४५२ लक्ष | ––– |
| <u>नवीन सुचविलेली कामे –</u><br>मलनिःस्सारण देखभाल दुरूस्ती विभाग, पुणे महानगरपालिका,<br>१. नगररोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत लक्ष्मी माता मंदिर विमाननगर व सकोरेनगर येथील नाल्यालगत सिमाभिंत बांधणे. | ––– | ९५ लक्ष |
| २. ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत संतगाडगे महाराज वसाहत येथील नाल्यालगत सिमाभिंत बांधणे. | ––– | ३२ लक्ष |
| ३. शिवाजीनगर–घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या महादजी शिंदे उद्यानाच्या कडेने सिमाभिंत बांधणे. | ––– | ९५ लक्ष |
| ४. कात्रज स.नं. ४५ येथील नियोजित डी.पी. रोड लगत आंबिल ओढ्याच्या कडेने सिमाभिंत बांधणे. | ––– | ९० लक्ष |
| ५. वारजे स.नं. ७७,७८,८२,८३ मधील २४ मी. डी.पी. रोड येथील नाल्यालगत आर.सी.सी. सिमाभिंत बांधणे. | ––– | ९५ लक्ष |
| ६. कात्रज वसाहत येथेनाल्यास उर्वरित संरक्षक सिमाभिंत बांधणे. | ––– | ४५ लक्ष |

निर्णय : विषय क्र. १०४ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०५

पुणे मनपाहद्दीतील सार्वजनिक व वस्ती पातळीवरील शौचालये व मुताऱ्या छोट्या वाहनावरील हाय प्रेशर जेटींग मशीनच्या सहाय्याने यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/घन.व्यव/३८६, दि. १/८/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १५०

संदर्भ– १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/घन. व्यव/३८६, दि. १/८/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१४, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाहद्दीतील सार्वजनिक व वस्ती पातळीवरील शौचालये व मुताऱ्या छोट्या वाहनावरील हाय प्रेशर जेटींग मशीनच्या सहाय्याने यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे या कामाकरिता परिमंडळ निहाय मान्य पूर्वगणन पत्रकाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार आर्थिक तरतूद उपलब्ध होणेकरिता खालील बार्बीस मान्यता देण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ (ब) नुसार मान्य निविदाधारकास प्रस्तावित कामाच्या अनुषंगाने पुढील वर्षापासून सन २०२३–२०२४ या वर्षाकरितार.रू. ९,९७,६२,६१५/– ,सन २०२४–२०२५ या वर्षाकरिता र.रू. १०,५१,८५,३७०=६० ,सन २०२५–२०२६ या वर्षाकरिता र.रू. १०,९९,८६,५४२=५०, सन २०२६–२०२७ या वर्षाकरिता र.रू. ११,५०,६९,७७३/– असे एकूण ५ वर्षे कालावधीकरिता ५ झोनसाठी मा. तांत्रिक छाननी समिती यांचा ठराव क्र. ६१, दि. १४/०६/२०२२ अन्वये मान्यतेनुसार सुमारे र.रू. ५२,५३,३५,८३०=८० इतक्या खर्चाचे दायित्व पत्करावे लागणार असून पाच वर्षासाठी एकूण र.रू. ५२,५३,३५,८३०=८० रक्कम उपलब्ध होणेस,

२)वरील अनुषंगाने खात्याकडील **RE19A139** पुणे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता यांत्रिकीपद्धतीने करणे (भाग 'अ' व 'ब' ) या बजेट हेडवर सदर तरतूद प्रतिवर्षी निविदा मुदतीच्या कालावधीपर्यंत उपलब्ध करणेस,

३)प्राप्त निविदादरानुसार मा. स्थायी समितीची मान्यता मिळाले नंतर परिमंडळ निहाय निविदा रक्कमेत अल्प फेरफार होण्याची शक्यता आहे. सबब प्राप्त निविदा दरानुसार वार्षिक दायित्व पत्करणे संबंधी आवश्यक त्या मान्यता देण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस व त्यानुसार कार्यवाही करणेस,

निर्णय : विषय क्र. १०५ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक : १०६

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत रजपूत झोपडपट्टी एरंडवणा येथील ड्रेनेजलाईन चोकअप होऊन झोपडपट्टीत पाणी घुसत असल्याने त्या ठिकाणी नव्याने ६०० मिमी व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.३/३८७, दि. १/८/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १५१

संदर्भ– १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि. क्र. ३/३८७, दि. १/८/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१५, दि.५/८/२०२२

––––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत रजपूत झोपडपट्टी एरंडवणा येथील ड्रेनेजलाईन चोकअप होऊन झोपडपट्टीत पाणी घुसत असल्याने त्या ठिकाणी नव्याने ६०० मिमी व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणे या कामाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ६७ (३) (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदरच्या खालील बाबी अवलोकनार्थ सादर करणेत आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ६७ (३) (क) दिनांक १८.०७.२०२२ पासून सदरचे काम पूर्ण करून घेणेकामी सर्वात कमी दर सादर केलेले ठेकेदार मे. आकाश कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा. श्री. सुरेश तम्मा जाधव यांचेकडून ॲटपार दराने (०.००%) दराने काम करून त्यानुसार सदरचे काम सद्यस्थितीत जागेवर सुरू करण्यात आले आहे,

२) वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत रजपूत झोपडपट्टी एरंडवणा येथील ड्रेनेजलाईन चोकअप होऊन झोपडपट्टीतपाणी घुसतअसल्याने त्या ठिकाणी नव्याने ६०० मिमी व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणे या कामाचे बिल (**GST** व अन्य करांसहित ) व सदरचे बिल १९४९ चे कलम ६७ (३) (क) अंतर्गत करावयाच्या कामांसाठी खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेत येणार आहे,

अर्थशिर्षक :– सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक – **ZE16B102/D2-407**

पाणीपुरवठा व जलोत्सारण विभागाचे भांडवली व खास निधीजमा व खर्चाचे अंदाजपत्रक, यादी क्र. डी २, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे. ( पान क्र. ३५) , उपलब्ध तरतूद र.रू. ५.०० कोटी पैकी र.रू. ४८,१९,७०३=७८.

निर्णय : विषय क्र. १०६ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक :१०७

सुतारवाडी पाषाण लिंक रोडस.नं. १२१ (पार्ट ) येथे क्रिडांगण विकसित करणेसाठी र.रू. २७५ लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणे, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३८८, दि. १/८/२०२२ चे पत्र.

ठराव क्रमांक :– १५२

संदर्भ– १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३८८, दि. १/८/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१६, दि.५/८/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

सुतारवाडी पाषाण लिंक रोडस.नं. १२१ (पार्ट ) येथे क्रिडांगण विकसित करणेसाठी र.रू. २७५ लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता देण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग, पुणे महानगरपालिका,<br>बजेटकोड नं. **CE17A242/SJ6-93,** भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | २७५ लक्ष | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम –</u><br>भवनविभाग, पुणे महानगरपालिका, सुतारवाडी पाषाण लिंक रोड स.नं. १२१ (पार्ट ) येथे फुटबॉल ग्राऊंड विकसित करणे. | --- | २७५ लक्ष |

निर्णय : विषय क्र. १०७ संमत झाल्याचे मा.प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्रमांक :१०८

उपआयुक्त परिमंडळ क्र.२ कार्यालय अंतर्गत औंध बाणेर, शिवाजीनगर घोलेरोड, कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत पडीक हद्दींची दैनंदिन स्वच्छता करणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. २/४०५, दि. ३/८/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– १५३

संदर्भ– १) सन २०२२–२३ या आर्थिक वर्षातील अंदापत्रकातील तरतुदी स मा. मुख्य लेखा वित्त विभाग यांचे जा.क्र. ५७८, दि. १८/५/२०२२ नुसार वित्तीय समितीची मान्यता.
२) मा. उप आयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र. ५७, दि. १६/०३/२०२२ रोजीचे कंत्राटी सेवक संख्येचे पत्र.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. २/४०५, दि. ३/८/२०२२ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५१७, दि.५/८/२०२२

----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

उपआयुक्त परिमंडळ क्र.२ कार्यालय अंतर्गत औंध बाणेर, शिवाजीनगर घोलेरोड, कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत पडीक हद्दींची दैनंदिन स्वच्छता करणेकामी महापालिका अधिनियम महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये ठेकेदारांची नेमणूक करणेस व त्यानुसार ही कामे तातडीची व आवश्यक बाब म्हणून ६७ (३) (क) अंतर्गत करून घेणेची बाब व त्याबाबतचे प्रतिवृत्त निदर्शनास आणण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.

१) औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आऊटसोर्सिंग पद्धतीने हद्दीतील झाडण काम माहे १ एप्रिल २०२२ पासून ते या वर्षीच्या नवीन निविदेचे कार्यदेश होईपर्यंतच्या कालावधीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिस लि. यांचेकडून मान्य दरापेक्षा २ % जास्त दराने करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस,

२) शिवाजीनगर घोलेरोड,क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत आऊटसोर्सिंग पद्धतीन`हद्दीतील झाडण काम माहे १ मे २०२२ पासून ते या वर्षीच्या नवीन निविदेचे कार्यदेश होईपर्यंतच्या कालावधीसाठी महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मे. नंदिनी डेव्हलपर्स यांचेकडून मान्य दरापेक्षा २ % जास्त दराने करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस,

